**महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण, २००१.**
**क्रीडा संकुलाकरीता उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या जमिनीचा वापर वाणिज्यीक प्रयोजनासाठी करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.- १२१/क्रीयुसे-१.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २४ फेब्रुवारी २००३

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण २००१ अंतर्गत "गाव तेथे क्रीडांगण" त्याचप्रमाणे तालुका हा घटक धरुन किमान प्रत्येक तालुक्यात एक 'तालुका क्रीडा संकुल', क्रीडा विकासाच्या किमान सुविधासह उपलब्ध करुन देण्याच्या संकल्पनेस मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर किमान राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देणे त्याचप्रमाणे विभागीय स्तरावर किमान आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देणे याकरीता अनुक्रमे तालुका क्रीडा संकुल, जिल्हा क्रीडा संकुल, विभागीय क्रीडा संकुलांची स्थापना संपूर्ण राज्यामध्ये करण्यात येत आहे. या क्रीडा संकुलाकरीता आवश्यक ती शासकीय जमिन महसूल विभागाकडून प्राप्त करुन क्रीडा संकुल समितीकडे वर्ग करुन त्यावर क्रीडा संकुल बांधणे अपेक्षित आहे. अशा प्रकारची क्रीडा संकुले साकार होत असतानाच या क्रीडा संकुलांच्या निर्मितीमध्ये होणारी गुंतवणूक त्याचप्रमाणे दैनंदिन खर्च भागविण्याच्या दृष्टीने जेथे - जेथे या क्रीडा संकुलाकरीता उपलब्ध असलेल्या जमिनीचा वापर वाणिज्यीक प्रयोजनासाठी होण्याची शक्यता आहे अशा ठिकाणी या जमिनीचा वापर वाणिज्यीक प्रयोजनासाठी करुन याद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नातून क्रीडा संकुलाची स्थापना, देखभाल आदी खर्च करण्यास परवानगी देण्याची बाब शासन विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** क्रीडा संकूलांकरीता जागा उपलब्ध करुन देणे व या जागेचा वाणिज्यिक प्रयोजनासाठी वापर करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शासन मंजूरी देण्यात येत आहे.

(१) जिल्हाधिकारी यांनी जिल्हा क्रीडा संकुल समितीचे अध्यक्ष व जिल्हाधिकारी म्हणून क्रीडा संकुलासाठी योग्य अशी शासकीय जमिन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांची जमिन शोधून क्रीडा विकासाकरीता सदर जमिन इयर मार्क करण्यात यावी व प्रश्नाधीन जमिन क्रीडा विकासासाठी म्हणजेच सार्वजनिक प्रयोजनासाठी मूल्यरहित भोगाधिकार (Free of occupancy price) व सारा माफीने (Free of revenue) संबधित क्रीडा विकास संस्था म्हणजे विभागीय क्रीडा संकुल समिती, जिल्हा क्रीडा संकुल समिती, तालुका क्रीडा संकुल समितीकडे वर्ग करावी. स्थानिक स्वराज्य संस्थांची जमिन त्यांचेशी सहमतीचा अभिलेख करुन (M.O.U.) घेण्यात यावी.

(२) एकूण क्षेत्राच्या १/३ पर्यंत क्षेत्र वाणिज्यिक प्रयोजनासाठी ( म्हणजेच किफायतशीर प्रयोजनासाठी) वापरण्यास संबंधित क्रीडा संकुल समिती सक्षम राहील. अशा प्रकारे वाणिज्यिक प्रयोजनाचा वापर मुंबई महानगरपालिका (अन्य महानगरपालिका) स्थानिक महानगरपालिका /नगरपालिका / नियोजन प्राधिकारी ( planning Authority) अथवा विशेष नियोजन प्राधिकारी ( Special Planning Authority) विकास नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या प्रयोजनासाठी वापरण्यास परवानगी देण्यात येईल.

(३) वाणिज्यिक प्रयोजनासाठी तयार करण्यात आलेल्या गाळ्यांचे हस्तांतरण करताना सदर गाळ्यांची अनामत रक्कम ( Deposit) भोगाधिकार मूल्य (Occupancy price) योग्य ठरविण्याचे अधिकार संबंधित क्रीडा संकुल समितीला असतील.

(४) सदर वाणिज्यिक प्रयोजनासाठी म्हणजेच अधिक किफायतशीर प्रयोजनार्थ वापरण्यांकरिता परवाना फी अथवा मासिक परवाना ' फी ' ठरविण्याचे अधिकार क्रीडा संकुल समितीला असतील.( तालुका क्रीडा संकुल समितीने उपरोक्त दोन्ही बाबीं करीता जिल्हाधिकारी यांची मान्यता घ्यावी)

(५) सदर संकुलाची निर्मिती करताना या जमिनीचा वापर **वित्तीय सहाय्यासह बांधा व हस्तांतरीत करा / बांधा, वापरा व हस्तांतरीत करा / बांधा व हस्तांतरीत करा** या तत्वावर बांधण्यास विहित अटी व शर्तीनुसार मंजूरी देण्यास विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत **करण्यात येत** आहे. (तालुका क्रीडा संकुल समितीचा प्रस्ताव मान्य करण्यास जिल्हाधिकारी **यांना सक्षम अधिकारी म्हणून जाहिर करण्यात येत आहे.**)

(६) वाणिज्यीक वापरातून प्राप्त होणारी सर्व रक्कम संबधित क्रीडा संकुलाच्या विकासाकरीता ठेवण्याची परवानगी राहील व अनर्जित रकमेचा काही भाग शासनास देण्याची **अट** लागू रहाणार नाही.

(७) या जमिनीचा वापर **बांधा, वापरा व हस्तांतरीत करा अथवा अर्थसहाय्य करा, बांधा व हस्तांतरीत करा अथवा बांधा व परत करा** या तत्वावर बांधण्याकरिता सर्वसाधारण अटी व शर्ती सोबतच्या **परिशिष्ट - 'अ'** प्रमाणे, मात्र मिडास अधिनियमाच्या तरतुदीच्या अधिन राहून मान्यता देण्यात यावी.

(८) शासकीय क्रीडा संकूलाकरीता उपलब्ध करुन दिलेली जमिन जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगीशिवाय अन्य विभागास अथवा खाजगी व्यक्तीस अशी जमिन हस्तांतर / विक्री / भाडेपट्टयाने देता येणार नाही.

(९) उपरोक्त अटी व शर्तीमध्ये स्थळपरत्वे . कालपरत्वे योग्य त्या सुधारणा करण्याचे अधिकार वरील क्र. ७ च्या अधिन राहून प्रशासकीय विभागास राहतील.

सदर शासन निर्णय महसूल व वन विभाग त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रदीप सं.इंदुलकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय
संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा संकूल कार्यकारी समिती. (पत्राने)
सर्व प्रांत अधिकारी / तहसिलदार
उपसंचालक,क्रीडा व युवकसेवा, मुंबई / नागपूर / औरंगाबाद / कोल्हापूर
सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी / तालुका क्रीडा अधिकारी.
उप सचिव, महसूल व वन विभाग / नियोजन विभाग / वित्त विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग / ग्राम विकास व जलसंधारण विभाग / नगर विकास विभाग.
सर्व महापालीका आयुक्त / सर्व मुख्याधिकारी नगर परिषद.
मा. मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (क्रीडा ) यांचे खाजगी सचिव
मा. प्रधान सचिव (क्रीडा ) यांचे स्वीय सहायक
निवड नस्ती, (क्रीयुसे-१)

# परिशिष्ट "अ"

## बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर राज्यात उभारण्यात येणाऱ्या क्रीडा संकुलासाठी मार्गदर्शनपर सूचना

**प्रस्तावना :-** राज्यामध्ये क्रीडा विकासास चालना देण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने राज्यामध्ये जिल्हास्तरावर जिल्हा क्रीडा संकुले, विभागीय स्तरावर विभागीय क्रीडा संकुले, तालुका स्तरावर तालुका क्रीडा संकुले (तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र) स्थापन करणे त्याचप्रमाणे बृहन्मुंबईकरीता विशेष कृती आराखडा अंतर्गत इनडोअर स्टेडियम, धावनपथ, विविध खेळांची मैदाने, जलतरण तलाव इ.क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे. सबब क्रीडा विकासास चालना देण्याच्या दृष्टीने "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (Built, Operate and Transfer)" किंवा "बांधा, मालकी ठेवा, वापरा व हस्तांतरीत करा (Built, Own, Operate and Transfer)" अर्थसहाय्य करा, बांधा व हस्तांतरीत करा (Finance, Built & Transfer) या तत्वावर अशा प्रकारची बांधकामे खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून यशस्वीपणे पूर्ण करता येतील. ही बाब लक्षात घेऊन ज्या जिल्ह्यांमध्ये जिल्हा क्रीडा संकुले उभारण्यासाठी जिल्हा क्रीडा संकुलांच्या जागांना वाणिज्यीक स्वरुपाचे महत्व (Commercial Potential) आहे, अशा जिल्ह्यांमध्ये या क्रीडा संकुलाचे बांधकाम "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" किंवा "बांधा, मालकी ठेवा, वापरा व हस्तांतरीत करा", "अर्थसहाय्य करा, बांधा व परत करा" या तत्वावर हाती घेता येईल काय, यासंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. इतर अनेक क्षेत्रामधील अनुभव विचारात घेऊन जिल्हा क्रीडा संकुलांचे बांधकाम उपरोक्त तत्वानुसार करण्यास हरकत नसावी, तथापि अशा स्वरुपाची बांधकामे करण्यापूर्वी त्या संबंधीचा प्रस्ताव जिल्हा क्रीडा समितीने तयार करुन मान्यतेस्तव सादर करणे आवश्यक आहे. असा प्रस्ताव सादर करताना त्यामध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश असावा. यासंबंधीच्या मार्गदर्शनपर सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत :-

१) क्रीडा संकुलासाठी निहित करण्यात आलेली जमिन जिल्हा क्रीडा संकूल समितीच्याच ताब्यात राहील. या जमिनीवर विकासकाचा, क्रीडा संकुल अथवा क्रीडा संकुलातील काही भाग बांधणाऱ्या कंत्राटदाराचा अथवा या क्रीडा संकुलातील इमारतीचा वाणिज्यीक वापर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा या जमिनीवर कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क (Ownership right) प्रस्थापित होणार नाही.

२) प्रकल्प अहवाल तयार करताना क्रीडा संकुलासाठी निहित करण्यात आलेल्या एकूण जमिनीचे क्षेत्रफळ व त्याची प्रचलित दराने येणारी किंमत तसेच त्यापैकी किती क्षेत्रावर "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" किंवा "बांधा, मालकी ठेवा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर खाजगी विकसनकर्त्यांकडून कोणकोणत्या प्रकारचे बांधकाम करण्यात येणार आहे ते स्पष्ट करुन या एकूण बांधकामांखालील क्षेत्राची विगतवारी चौरस मीटरमध्ये दर्शविण्यात यावी व त्यासाठी अपेक्षित असलेल्या खर्चाचा तपशील देण्यात यावा. त्याचप्रमाणे या बांधकामाखाली येणाऱ्या क्षेत्राची सर्वसाधारणपणे बाजारभावाप्रमाणे येणारी किंमत दर्शविण्यात यावी.

३) (अ) अशा प्रकारे खाजगी माध्यमातून विकास करताना/ क्रीडा संकुल उभारीत असताना शासनाने मान्यता दिलेल्या सर्व बाबींचे बांधकाम करण्यासाठी तसेच अन्य प्रकारच्या सर्व क्रीडा सुविधा आणि दुकाने, गाळे, कार्यालयीन जागा व क्लब हाऊस सारखे प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक असलेला प्राथमिकरित्या सर्व निधी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.

(ब) जिल्हा क्रीडा समितीने प्रस्ताव सादर करताना त्यामध्ये खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून उपलब्ध होत असलेल्या निधीचा सविस्तर तपशील स्पष्टपणे नमूद करण्यात यावा. जिल्हा क्रीडा संकुल समितीने प्रस्ताव सादर करताना त्यामध्ये उपलब्ध शासकीय निधी व खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून उपलब्ध होणारा निधी या संबधिचा सविस्तर तपशील स्पष्टपणे नोंदवावा.

खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून प्रकल्पाची उभारणी करीत असताना अशा कंत्राटदाराला या प्रकल्पासाठी नेमकी किती गुंतवणूक करावी लागेल व त्याला प्रकल्पाची सुरुवात करीत असताना दुकाने, गाळे व कार्यालयीन जागा इत्यादिंच्या माध्यमातून अनामत रकमेपोटी किती रक्कम उपलब्ध होईल, तसेच भाड्यापोटी वार्षिक किती रक्कम मिळू शकेल यासंबधिची आवश्यक ती सर्व आकडेवारी प्रस्तावामध्ये नमूद करावी.

४) कंत्राटदाराने शासकीय गुंतवणूक करावयाचा निधी लक्षात घेऊन या रकमेची यथायोग्य परतफेड होण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक असलेला कालावधी निश्चित करण्याबाबत जिल्हा क्रीडा समितीने निविदा सूचना काढण्यापूर्वी निर्णय घ्यावा व तो निविदा सूचनेमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात यावा आणि या कालावधीस शासनाची मान्यता घ्यावी.

५) उपरोक्त कालावधीमध्ये क्रीडा संकुलाचे व त्या अंतर्गत असलेल्या सर्व सुविधांचे व्यवस्थापन आणि देखभाल, दुरुस्ती यासाठी किती खर्च येईल याबाबतचा तपशिल स्वतंत्रपणे देण्यात यावा.

६) उपरोक्त कालावधीमध्ये क्रीडा संकुलाचे व त्याअंतर्गत असलेल्या सर्व सुविधांचे व्यवस्थापन आणि देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

७) क्रीडा संकुल परिसरात बांधण्यात येणारी दुकाने, गाळे, कार्यालयीन जागा यासाठी आकारण्यात येणा-या मासिक / वार्षिक भाड्याची रक्कम कराराच्या कालावधीत घेण्याचा अधिकार कंत्राटदाराला/क्रीडा समितीला राहील. या रकमेमध्ये कालपरत्वे किती वाढ केली जाईल याचा तपशिल देण्यात यावा.

८) जिल्हा क्रीडा संकूल समितीच्या परवानगीशिवाय क्रीडा संकुल परिसरातील कोणतेही दुकान/ गाळा / कार्यालयीन जागेचे हस्तांतरण करण्याचा अधिकार संबंधित व्यक्ती अथवा कंत्राटदार यांना राहणार नाही, अशा स्वरुपाचे हस्तांतरण करताना मूळ व्यक्तीने जमा केलेली ना-परतावा रक्कम (**Upfront Non-Refundable Payment**) सदर व्यक्तीस परत मिळणार नाही व त्यांनी भरलेल्या रकमेच्या १० टक्के रक्कम अथवा जिल्हा क्रीडा संकुल

समिती ठरवेल एवढी रक्कम हस्तांतर शुल्क म्हणून जिल्हा क्रीडा संकूल समितीकडे जमा करावी लागेल.

९) जिल्हा क्रीडा संकुल समितीने स्वतः बांधल्यास अथवा खाजगी विकासक करारामुळे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर यातील काही भाग उदा.क्लबहाऊस व अन्य बाबी देखभालीसाठी, व्यवस्थापनासाठी, चालविण्यासाठी देता येतील. तसेच क्रीडा संस्थांना राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूंना अकादमी चालविण्यासाठी विहित अटी शर्तीवर देता येईल. (तथापि सामान्य माणसास प्रवेश नाकारला जाणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.) तसेच कंत्राटदाराचा बांधकामाचा कालावधी संपल्यानंतर जेव्हा क्रीडा संकुल हस्तांतरीत केले जाईल, त्यावेळेपासून या संकुलाचे व त्या अंतर्गत असलेल्या सर्व सुविधांचे व्यवस्थापन व देखभाल, दुरुस्ती कशा प्रकारे केली जाईल यासंबंधी जिल्हा क्रीडा संकूल समितीने प्रस्तावासोबत स्वतंत्र विवरणपत्र सादर करावे.

१०) अ) क्रीडा संकुल उभारणीचे काम आर्थिकदृष्ट्या परवडण्याजोगे (Financially viable ) होण्यासाठी क्रीडा संकुलामध्ये " क्लब हाऊस " ची संकल्पना राबविता येईल, तथापि क्लब हाऊसच्या आजीव सदस्यत्वापोटी मिळणारी सर्व रक्कम (Life mambership fees) जिल्हा क्रीडा संकूल समितीच्या खात्यामध्ये जमा होईल. या रकमेवर कंत्राटदाराचा कोणताही हक्क राहणार नाही, परंतु वार्षिक विहित सदस्यत्व शुल्काची रक्कम कंत्राटदार घेऊ शकेल.

ब) क्लब हाऊससाठी कमाल किती आजीव सदस्य संख्या असावी व त्यांना किती शुल्क आकारण्यात यावे तसेच खाजगीरित्या चालविण्यास दिले असल्यास वार्षिक 'फी' ची मर्यादा किती असावी हे समितीने ठरवावे.

क) आजीव सदस्यांना आकारावयाच्या वार्षिक शुल्काची रक्कम देखील समितीने निश्चित करावी.

ड) आजीव सदस्यांव्यतिरिक्त क्लब हाऊससाठी एक वर्ष कालावधीचे तात्पुरते सदस्यत्व ( Temporary membership ) देता येईल. अशा सदस्यासाठी आकारावयाच्या शुल्काची रक्कम जिल्हा क्रीडा समितीने ठरवावी. या रकमेपैकी ५० टक्के रक्कम समितीला व ५० टक्के रक्कम कंत्राटदाराला मिळेल अथवा समिती ठरवेल त्यानुसार निश्चित करण्यात यावी.

इ) क्लब हाऊससाठी यथायोग्य नियमावली जिल्हा क्रीडा संकूल समितीने तयार करावी व या नियमावलीस क्रीडा व युवक सेवा संचालनालयाची मान्यता घ्यावी.

११) क्लब हाऊसमध्ये आवश्यक असलेले सर्व प्रकारचे फर्निचर व अंतर्गत सजावट (Interior decoration ) आणि यथावश्यक पाणीपुरवठा व विद्युत पुरवठा तसेच भोजनगृहासाठी आवश्यक असलेली साहित्य सामुग्री (हॉटप्लेटस्, डिपफ्रिजर्स, टेबल-खुर्च्या इ. सर्व साहीत्य ) उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१२) क्लब हाऊसच्या वार्षिक सदस्यत्व शुल्कातून मिळणारी रक्कम तसेच दुकाने, गाळे व कार्यालयीन जागा इत्यादिंच्या भाडयापोटी मिळणाऱ्या एकुण रक्कमेतून कंत्राटदार स्वामित्व

शुल्कापोटी (Royalty ) काही रक्कम जिल्हा क्रीडा संकूल समितीला देऊ शकेल , हे लक्षात घेऊन जास्तीत जास्त स्वामित्व शुल्क देऊ करणाऱ्या तसेच अंदाजित कालावधीपेक्षा कमीत कमी कालावधीमध्ये क्रीडा संकुल, गाळे/दुकाने, कार्यालयीन जागा, क्लब हाऊस इमारत व अन्य सर्व सोयी-सुविधा जिल्हा क्रीडा संकूल समितीकडे सुपूर्द करण्याची क्षमता असलेल्या कंत्राटदाराला " बांधा, वापरा व हस्तांतरीत करा " या तत्वावर कंत्राट मंजूर करण्यात यावे. जिल्हा क्रीडा संकूल समिती दुकाने, गाळे व कार्यालयीन जागा इ.चे शुल्क निश्चित करण्यास सक्षम असेल.

१३) क्लब हाऊसमध्ये उपहारगृहापोटी मिळालेली रक्कम अधिक दरवर्षी जमा होणारी स्वामित्व शुल्काची रक्कम यातून एक निधी (Corpus) जिल्हा क्रीडा संकूल समितीने तयार करावा. कंत्राटदाराने निर्धारित कालावधीनंतर क्रीडा संकुल, गाळे व क्लब हाऊस इत्यादि सुविधा जिल्हा क्रीडा संकूल समितीकडे हस्तांतरीत केल्यानंतर या रकमेवर मिळणाऱ्या व्याजातून तसेच मासिक जमा होणाऱ्या शुल्काच्या रकमेतून क्रीडा संकुलाचे व्यवस्थापन व देखभाल दुरुस्ती करण्यासाठीचा आराखडा तयार करण्यात यावा.

१४) जिल्हा क्रीडा संकुलामधील क्रीडा सुविधांच्या वापरासंबंधी शुल्क आकारणीचे दर वेळोवेळी निश्चित करण्याचा अधिकार जिल्हा क्रीडा संकूल समितीला राहील.

१५) जिल्हा क्रीडा संकुलामधील उपलब्ध सर्व सुविधांचा पुरेपूर व यथायोग्य वापर होण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक ते वेळापत्रक जिल्हा क्रीडा संकूल समितीने तयार करावे व स्वयंसेवी संस्था / व्यक्ती / संघटना यांच्यामार्फत त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१६) जिल्हा क्रीडा संकूल समिती ठरवील त्या खेळांसाठी क्रीडा संकुलामधील सर्व सुविधा दैनंदिन सरावासाठी शाळा, महाविद्यालये, क्रीडा संस्था, क्रीडापटू यांना काही मर्यादित वेळेपुरती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१७) क्रीडा संकुलामधील सुविधांचा वापर ज्या ज्या वेळी शासकीय स्पर्धासाठी व कार्यक्रमासाठी करावयाचा असेल, त्या त्या वेळी इतर कारणासाठी त्याचा वापर न करु देता, त्या त्या कालावधीसाठी क्रीडा संकुल निःशुल्क उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्याप्रमाणे क्लब सदस्यांसाठी विशिष्ट वेळ ठरविण्यात यावा.

१८) क्रीडा संकुलातील दुकाने, गाळे, कार्यालयीन जागा व अन्य सुविधांचा अवैध वापर कंत्राटदार वा अन्य कोणासही करता येणार नाही.

१९) निर्धारित कालावधीनंतर क्रीडा संकुलामधील सर्व दुकाने, गाळे, कार्यालयीन जागा, क्लब हाऊस इत्यादि सर्व मालमत्ता, त्यावर असलेली पाणी पुरवठा व्यवस्था, विद्युत पुरवठा व्यवस्था, फर्निचर व निर्माण केलेल्या अन्य सर्व सुविधांसह जिल्हा क्रीडा संकूल समितीकडे हस्तांतरीत करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कंत्राटदाराला अथवा अन्य व्यक्तीला जेव्हा क्लब हाऊस किंवा अन्य वास्तुंचा वापर करण्याची परवानगी देण्यात येईल त्या कालावधीतील वीज देयक, पाण्याचे देयक व अन्य देखभालीचा खर्च संबंधित कंत्राटदार अथवा संस्थेला करावा लागेल. कंत्राटदाराचा कालावधी समाप्त झाल्याबरोबर त्यापासून

मिळणारे उत्पन्न समितीकडे जमा करण्यात यावे. या कालावधीनंतर कंत्राटदाराला या प्रकल्पापासून कोणत्याही प्रकारचे उत्पन्न मिळण्याचा हक्क राहणार नाही.

२०) जिल्हा क्रीडा संकूल समितीतर्फे कंत्राटदारासाठी निर्दिष्ट करण्यात येणाऱ्या अटी व शर्तीची यादी प्रस्तावासोबत स्वतंत्रपणे जोडण्यात यावी.

२१) मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ मधील तरतूदीनुसार स्वामित्व, शुल्काच्या रकमेवर आधारित यथायोग्य मुद्रांक शुल्काच्या बंधपत्रावर कंत्राटदाराच्या खर्चाने जिल्हा क्रीडा संकूल समितीबरोबर करुन ठरवील, अशा व त्याचप्रमाणे जिल्हा क्रीडा संकूल समिती ठरवील अशा, अटी व शर्ती नमूद करुन विहित कालावधीचा करारनामा कंत्राटदारास करुन द्यावा लागेल.

२२) मूळ निविदा सूचनेमध्ये नमूद केलेला कालावधी वाढविणे अथवा कमी करण्यासंबंधीचा अधिकार संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहील.

२३) क्रीडा संकुलाचा प्रस्ताव "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (Built, Operate & Transfer) किंवा अर्थसहाय्य करा, बांधा व हस्तांतरीत करा ( Finance, Built & Transfer) या तत्वावर अशा प्रकारची बांधकामे खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून यशस्वीपणे पूर्ण करता येतील. ज्या जिल्हयांमध्ये जिल्हा क्रीडा संकुले उभारण्यासाठी जिल्हा क्रीडा संकुलांच्या जागांना वाणिज्यिक स्वरुपाचे महत्व (Commercial Potential) आहे अशा ठिकाणी स्थळपरत्वे व जागेचे महत्व लक्षात घेऊन यापैकी योग्य तो प्रस्ताव वा अन्य प्रस्ताव निवड करण्याचे अधिकार जिल्हा क्रीडा संकूल समितीस राहतील.

२४) उपरोक्त अटी शर्तीमध्ये स्थळपरत्वे बदल करण्याचे त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार अधिक अटी टाकण्याचे अधिकार संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना असतील.

*********

एच-1113(500-2-03)5.